जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक ३१.१०.२०२४**

## ‘‘बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगणाऱ्या इसमास शिताफीने अटक’’

दिनांक ३०.१०.२०२४ रोजी कळवा पोलीस ठाणे येथील पोलीसांना गोपनीय बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, एक इसम हा बेकायदेशीर अग्निशस्त्र जवळ बाळगुन सहकार विद्यालयाच्या समोर, सार्वजनिक रोडवर, कळवा, ठाणे येथे फिरत आहे. सदर माहितीवरून सपोनि/पिंपळे, सपोनि/धोंडे व त्यांचे पथकाने दुपारी १४.४० वा.चे सुमारास, सहकार विद्यालयाच्या समोर, सार्वजनिक रोडवर, कळवा, ठाणे येथे एक इसम नामे तुषार राहुल सक्सेना, वय १९ वर्ष रा.साईनगर झोपडपट्टी, रबाळे, नवी मुंबई यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक पिस्टल (अग्निशस्त्र), एक जिवंत काडतुस व एक स्टीलचा चाकु मिळुन आला तसेच त्याच्या ताब्यात बुलेट मोटारसायकल मिळुन आली. सदर मोटार सायकलबाबत तपास केला असता, ती रबाळे पोलीस ठाणे गु.र.न. ५७९/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) मधील चोरी केलेली बुलेट मोटार सायकल असल्याचे निष्पन्न झाले. सदर पिस्टल (अग्निशस्त्र), जिवंत काडतुस, स्टीलचा चाकु व बुलेट मोटारसायकल ताब्यात घेण्यात आली आहे.

सदर घटनेबाबत सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादी वरून आरोपीविरूध्द गुन्हा रजि.क्रं.१४६८/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३(१),२५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१),१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/पिंपळे हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, ठाणे श्री.बुरसे, सहाय्यक पोलीस आयुक्त कळवा विभाग, श्री.उत्तम कोळेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक कळवा पोलीस ठाणे श्री. अशोक उत्तेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, सपोनि/पिंपळे, सपोनि/धोंडे व त्यांचे पथक यांनी केली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर